# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे पूरग्रस्तांसाठी ४ लाखांची मदत

**मुंबई :** सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागातील नागरिकांना मदतीचा ओघ सुरुच आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) प्राधिकरणानेही आपल्या कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार पूरग्रस्तांच्या मदतीसाठी दिला असून, यातून जमा झालेली ४ लाखांची मदत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केली. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी शुक्रवारी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मदत निधी सुपूर्द केला. कॉर्पोरेशनचे सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपापले एक दिवसाचे वेतन पूरग्रस्तांसाठी दिल्याने हा निधी निर्माण करता आला.